# प्रास्ताविक

## कोल्हापूर जिल्ह्यातील डाव्या पक्षाच्या चळवळी

## (१९४७ - १९९०)

या विषयावरील लघुशोध प्रबंध शिवाजी विद्यापीठाला सादर करताना मला अत्यानंद होत आहे.

भारतात इंग्रज राजवटीमध्ये लोकांची जी पिळवणुक होत होती. विशेषत: श्रमजीवी, कष्टकरी शेतकरी, कामकरी, मजूर ह्यांच्या दैन्यांवस्थेला पारावार नव्हता. त्या लोकांनी आपल्यावरील अन्यायासाठी वेळोवेळी उठाव, चळवळी केल्या. मी ह्या लघुशोध प्रबंधामध्ये अशा वर्गातील लोकांच्या हक्कासाठी, न्यायासाठी त्यांच्या वरील अत्याचारांची सोडवणुक करण्यासाठी स्वातंत्र्यानंतर जे लढे, चळवळी, मोर्चे शे.का. पक्षाने व कम्युनिस्ट पक्षाने काढले. त्याचा आढावा घेण्याचा हा माझा एक प्रामाणिक प्रयत्न आहे.

सर्व राजकीय पक्षात विशेषत: डाव्या आघाडीच्या पक्षाने अत्यंत मोलाचे व भरीव कार्य केलेले आहे. कोल्हापूर हे महाराष्ट्रातील डाव्या आघाडी पक्षाच्या चळवळीचे प्रमुख ठिकाण आहे. हा जिल्हा शे.का. पक्षाच्या चळवळीचा बालेकिल्ला म्हणून १९४८ पासून ओळखला जातो. ह्या जिल्ह्यातून श्रमजीवी, कष्टकरी, शेतकरी, कामकरी वर्गाने विधानसभा, लोकसभा येथे निवडणुकाद्वारे डाव्या आघाडीचे प्रतिनिधी निवडून आपला आवाज महाराष्ट्रात व दिल्लीमध्ये उठवून गरीब जनतेच्या प्रश्नांची सोडवणुक करण्याचे प्रयत्न केलेले आहेत. तसेच कोल्हापूर जिल्ह्यात कम्युनस्टि पक्षाने पण चांगले काम केले आहे.

या निमित्ताने शे.का. पक्षाचे व कम्युनिस्ट पक्षाचे कोल्हापूर जिल्ह्यातील कार्य किती महत्वाचे होते त्याचा उहापोह मी केला आहे.

सदर लघुशोध प्रबंध तयार करताना मी शे.का. पक्षाने वेळोवेळी काढलेली निवेदने, जाहीर पत्रके, निवडणुक जाहीर नामे तसेच शे.का. पक्षाच्या कार्यालयातील रेकॉर्डस, नेत्यांचा पत्र व्यवहार, तसेच कम्युनिस्ट पक्षाची कागदपत्रे, अहवाल जाहीरनामे, नेत्यांची भाषणे यांचा अभ्यासाची साधने म्हणून अभ्यासली आहेत त्याच बरोबर १९४० ते १९९० पर्यंतची दै. पुढारीच्या व दै. सत्यवादीच्या फाईल्स ह्या अभ्यासासाठी उपयुक्त आहेत. त्याचाही वापर मी योग्य ठिकाणी केलेला आहे. शिवाय कांही निवडक शे.का. पक्षाच्या व कम्युनिस्ट पुढा-यांच्याही मुलाखती घेतल्या आहेत. शिवाय संबधीत ग्रंथांचा वापर केला आहे.

ही अमोल संधी उपलब्ध करून देण्यात माझे मार्गदर्शक आदरणीय गुरूवर्य डॉ.भा.दे. खणे सर अनेक पुढा-यांनी, कार्यकर्त्यांनी सर्व स्तरावरील व्यक्तिंनी प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या सहकार्य करून उत्तेजन दिलेले आहे. या सर्वांचे ऋण व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजते.

सदर लघुशोध प्रबंध तयार करताना मला अनेकांचे सहकार्य व प्रोत्साहन मिळाले आहे. त्यांच्या नावाचा उल्लेख करणे मी माझे पवित्र्य कर्तव्य समजते.

सुरवातीस माझे मार्गदर्शक आदरणीय गुरूवर्य डॉ. भा.दे. खणे यांनी या कामी अपार परिश्रम घेतलेले आहेत. व अनमोल मार्गदर्शन केलेले आहे. वेळोवेळी प्रोत्साहनही दिलेले आहे. त्यामुळे मी हा लघुशोध प्रबंध व वेळेत पूर्ण करू शकले. त्याचां मला लाभलेला कौटुंबिक जिव्हाळा न विसरता येण्या सारखे आहे. हे सर्व शब्दातीत आहे. अशा ह्या माझ्या आदरणीय गुरूवर्याचे मी अंत:करणपूर्वक ऋणी आहे.

शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. व. शं. कदम तसेच माजी विभाग प्रमुख डॉ. भ.रा. कांबळे यांचीही आभारी आहे.

श्री. शाहू छत्रपती शिक्षण संस्था कोल्हापूरचे सेक्रेटरी माननीय श्री. चंद्रकांत बोंद्रे आणि इतर पदाधिकारी तसेच वसंतराव नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय , कोल्हापूरचे प्राचार्य, डॉ. के.एस. गुरव यांचीही ऋणी आहे. त्यांनी मला वेळावेळी सहकार्य व प्रोत्साहन दिले आहे.

शे.का. पक्षाचे प्रतिष्ठित थोर सामाजिक कार्यकर्ते प्रा. एन. डी. पाटील, भाई बाबासाहेब देसाई, कुरूंदवाड, भाई भगवानराव सुर्यवंशी, भाई हिंदूराव साळोखे, भाई आनंदराव साळोखे, भाई के.ब. जगदाळे, श्री. आण्णासाहेब चव्हाण, सौ. सुनंदा मोरे, भाई जी.डी. लाड, नागनाथआण्णा नायकवडी, सखाराम बापू खराडे, श्री आनंदराव ठोंबरे (वस्ताद) श्री. रसुल मुलानी, भाई मोहन पाटील(भैय्या), श्री. मोहनराव जाधव, आमदार संपत पवार - पाटील, प्रा, विष्णुपंत इंगवले, कुमार जाधव, केरबा पाटील, बी.डी. ठिकपूर्ले, गोविंद पानसरे, वसंतराव पंधारे, रविंद्र सबनीस, श्री. शेख, यांची बहुमाल सहकार्य व प्रोत्साहन मिळालेले आहे. या बद्दल या सर्व पुढा-यांची, कार्यकर्त्यांची आभारी आहे.

श्री. लक्ष्मणराव वर्णे, अकौंटंट, वीर शैव बॅन्क जयसिंगपूर, डॉ. माधवराव नागांवकर, डॉ. आण्णासाहेब मेथे, माजी प्राचार्य बी.ए. बाबर, श्री. माणगांवे, श्री. पी.सी. पाटील, ग्रंथपाल, न्यू कॉलेज, प्राचार्य श्री. ढवळे सर यांचे सहकार्य प्रोत्साहन, सदिच्छा माझ्या पाठीशी आहेत.

सामाजिक कार्यकर्ते श्री. प्रफुल्ल नरके (कोगे) श्री. शशिकांत म्हात्रे (कोल्हापूर) पंचायत समितीचे माजी सभापती, श्री. बी.एच. पाटील (वडणगे) श्री. तुकाराम बापू भोईटे (तुरूंबे) श्री. दत्ताजी टिपूगडे, नगरसेवक (शिवाजी पेठ) श्री. भिकशेठ पाटील, माजी महापौर (कोल्हापूर) श्री. बी.के. पाटील (सोनाळीकर) श्री. पुंडलिक श्रावण पोवार, संचालक बलभीम बँक श्री. राजीव वाबळे, पत्रकार कोल्हापूर प्रतिनिधी दैनिक ऐक्य सातारा, श्री. हणमंत तोरस्कर, श्री. एम. टी. पाटील (मांगोलीकर) श्री. दिलीप मोहिते कोल्हापूर, श्री. सदाशिव खाडे व बाळासाहेब खाडे (सांगरूळ ) ह्यांचे ऋण व्यक्त करण्याची संधी या निमित्ताने मला मिळत आहे.

ह्या माझ्या प्रबंधात मला शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयातील सर्व कर्मचारी तसेच दै. पुढारीचे संपादक, प्रतापसिंह जाधव तसेच पुढारी ऑफिस

कार्यालयातील श्री. शं. बा. भोसले, श्रीमती खोतलांडे, श्री. अरूण कांबळे, श्री दिलीप, श्री. पश्चिंद्रे तसेच दै. सत्यवादीचे संपादक श्री. राजकुमार पाटील त्याचे बंधू व भगिनी व सत्यवादी कार्यालयातील कमृचारी ह्यांचे बहुमोल सहकार्य लाभले आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील समाज कल्याण ऑफिसमधील माहिती विभागाचे प्रमुख श्री. खोराडे साहेब, तसेच त्याचे सहकारी या सर्वांनी मला कोल्हापूरच्या डाव्या आघाडीच्या चळवळीची माहिती उपलब्ध करून देण्यास मला बहुमोल मदत, सहकार्य केले आहे. या सर्वांचे मी आभार व्यक्त करते.

माझे गुरूवर्य कै. भाऊसाहेब महाराज (पंतबाळे कुंद्रीकर) माझे वडील कै. दत्तात्रय गणपत भोईटे (शे.का.प. कार्यकर्ते) माझी आई, कै.सौ. इंदिरा भोईटे, माझे आजोबा कै. शाहीर श्री. गणपत भोईटे, कै. श्री. तुकाराम रामजी नरके (वस्ताद) तसेच कै. श्री. रामचंद्र बाळकृष्ण म्हात्रे (शे.का. प. कार्यकर्ते) कै. श्री. बाबुराव वणिरे (शे.का.प. कार्यकर्ते) ह्यांचेही आर्शिवाद माझ्या पाठीशी आहेत.

माझे वडील बंधू श्री. नेताजी भोईटे (सहा. अधिक्षक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) बंधू तानाजी भोईटे माझ्या बहिणी कु. सुमती व वसुमती व श्री. लाटे (मन्या) यांनीही, अमोल सहकार्य, मदत व स्फुर्ती दिलेली आहे. या सर्वांचे ऋण शब्दातीत आहे.

जे.जे. टायपिंग सेंटरचे संचालक श्री. जे.जे. शिंदे त्यांचे चिरंजीव कु. सुशांत शिंदे. कु. शीतल शिंदे, श्री. विजयानंद पाटील ह्यांनीही अल्पावधीत उत्कृष्ठ व सुबक टंकलेखनाचे काम केले आणि संघवी यांनी छपाई व बांधणीचे काम अल्पावधीत व उत्कृष्ठरित्या पूर्ण करून दिले आहे, त्यामूळे हा लघुशोध प्रबंध वेळेत पूर्ण होऊ शकला, या त्यांच्या सहकार्या बद्दल मी त्यांचे आभारी आहे.

शेवटी या संशोधन कार्यासाठी ज्यांनी ज्यांनी मला सहकार्य दिले, प्रोत्साहन दिले आणि सुयश चिंतले त्या सर्व ज्ञात अज्ञातांचे मी अंत:करण पूर्वक ऋण व्यक्त करते.

कोल्हापूर

कु. अरूंधती दत्तात्रय भोईटे.

दिनांक :- ३१.१२.१९९८